# महाराष्ट्र विधानसभा

## पत्रक भाग दोन

## सोमवार, दिनांक २३ ऑगस्ट, २०२१ / ०१ भाद्रपद, १९४३ (शके)

७३. सर्व सन्माननीय सदस्यांना याव्दारे कळविण्यात येते की, श्री. मंगेश गोंदावले, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद यांनी सन्माननीय सदस्य श्री. उदयसिंग राजपूत यांच्या मतदारसंघात प्रायव्हेट कोव्हिड उपचार केंद्र सुरु केल्यासंदर्भातील माहिती सन्माननीय सदस्यांना न दिल्याने याबाबत सन्माननीय सदस्यांनी त्यांचेशी भ्रमणध्वनीव्दारे संपर्क साधला असता श्री. मंगेश गोंदावले यांनी सन्माननीय सदस्यांना उध्दटपणे उत्तर दिले. तद्नंतर सन्माननीय सदस्यांनी पुन:श्च श्री. मंगेश गोंदावले, यांचेशी संपर्क साधून नव्याने रुजू झालेल्या गटविकास अधिकाऱ्यांचे नाव व भ्रमणध्वनी क्रमांक देण्याची विनंती केल्यावर श्री.मंगेश गोंदावले यांनी अतिशय उर्मट भाषेत सन्माननीय सदस्यांसोबत संभाषण करुन सन्माननीय सदस्यांना अपमानास्पद वागणूक दिल्याने विशेषाधिकार भंग व अवमानाची बाब उद्‌भवल्याच्या धारणेने श्री.उदयसिंग राजपूत, वि.स.स. यांनी श्री. मंगेश गोंदावले, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद यांच्याविरुध्द दिनांक ०६ जुलै, २०२१ रोजी विशेषाधिकार भंग व अवमानाची सूचना दिली.

सदरहू सूचना मा. उपाध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम २८४ मधील तरतूदींच्या अधीनतेने विधानसभा विशेषाधिकार समितीकडे तपासणीसाठी व तपासणीचे निष्कर्ष मा.उपाध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांच्या अवलोकनार्थ सादर करण्यासाठी दिनांक १७ ऑगस्ट, २०२१ रोजी सुपूर्द केली आहे.

**विधान भवन**,
**मुंबई,**
दिनांक : २३ ऑगस्ट, २०२१

**राजेन्द्र भागवत**
प्रधान सचिव
महाराष्ट्र विधानसभा.

**याची प्रत :**

१. महाराष्ट्र विधानसभेचे सर्व संबधित सन्माननीय सदस्य.
२. महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व पक्ष कार्यालये.
३. संगणक कक्ष (website.)